|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Total Income from Operations | 32,392.58 | 27,325.57 | 30,528.87 | 1,00,427.98 | 85,019.66 |
| 2 | Profit before tax | 1,423.77 | 715.02 | 1,494.55 | 1,086.62 | 1,077.01 |
| 3 | Profit after tax | 1,264.48 | 727.21 | 1,224.63 | 711.95 | 795.47 |

**Notes :-**
1) The above results have been reviewed by the Audit Committee and approved by the Board of Director's at their respective meetings held on May 26, 2022. Audit under regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirement) Regulation, 2015 has been carried out by the statutory auditors of the Company. The auditors have expressed an unmodified report on the above results.
2) The above is an extract of the detailed format of quarterly and year ended financial results filed with the Stock Exchanges under Regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the quarterly and year ended financial results are available on the websites of the Stock Exchanges (www.nseindia.com and www.bseindia.com) and on the Company's website www.hplindia.com
3) Subject to the approval of the shareholders in the forthcoming Annual General Meeting of the company, the Board of Directors have recommended a final dividend of Rs. 0.15(1.5%) per equity share of Rs. 10 each for the financial year 2021-22.
4) The figures of the last quarter are the balancing figures between audited figures in respect of the full financial year upto March 31, 2022 and the unaudited published year-to-date figures up to December 31, 2021, being the date of the end of the third quarter of the financial year which were subjected to limited review.
5) Previous quarter/year ended figures have been regrouped/ restated whereever necessary.

For and on behalf of the Board of
HPL Electric & Power Limited
Lalit Seth
Chairman
DIN:00312007

Place : Noida
Date : 26.05.2022

# CROWN LIFTERS LIMITED

CIN: L74210MH2002PLC138439

CROWN LIFTERS SINCE 1986

Registered Office: 104, Raheja Plaza Premises Co-Op Soc. Ltd., Shah Industrial Estate,Veera Desai Rd, Andheri (W) Mumbai - 400053.
Tel No: +91 +91 22 4006 2829; E-mail: cs.cll@crownlifters.com; Website: www.crownlifters.com

**Statement of Financial Results for the Quarter and Year Ended on March 31, 2022**

(Rs. in Lakhs)

| Sr. No | Particulars | Quarter Ended 31/03/2022 (Audited) | Quarter Ended 31/12/2021 (Un-Audited) | Quarter Ended 31/03/2021 (Audited) | Year Ended 31/03/2022 (Audited) | Year Ended 31/03/2021 (Audited) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | Revenue from Operations | 962.48 | 302.03 | 453.15 | 1,992.41 | 1,217.55 |
| 2. | Other Income | 1.96 | 6.54 | 38.37 | 16.51 | 40.67 |
| 3. | **Total Income (1+2)** | **964.44** | **308.57** | **491.52** | **2,008.92** | **1,258.22** |
| 4. | **Expenses** | | | | | |
| (a) | Cost of Material consumed | 704.15 | 169.53 | 155.47 | 1,109.24 | 378.65 |
| (b) | Purchase of stock in trade | - | - | - | - | - |
| (C) | Changes in Inventories of Finished Goods, Work-In-Progress and Stock-In-Trade | - | - | - | - | - |
| (d) | Employee Benefits Expenses | 63.45 | 60.60 | 60.19 | 229.56 | 212.47 |
| (e) | Finance Costs | 14.18 | 22.51 | 76.73 | 105.80 | 305.23 |
| (f) | Depreciation and Amortisation Expenses | 60.23 | 62.80 | 89.17 | 269.58 | 451.75 |
| (g) | Other Expenses | 25.65 | 44.00 | 40.78 | 106.25 | 90.48 |
| | **Total Expenses (4)** | **867.66** | **359.44** | **422.35** | **1,820.43** | **1,438.58** |
| (5) | **Profit/(Loss) from Operations Before Exceptional Items & Tax (3 - 4)** | **96.78** | **(50.87)** | **69.17** | **188.48** | **(180.33)** |
| (6) | Exceptional Items | (183.16) | - | - | (293.00) | (393.61) |
| (7) | **Profit / (Loss) from Ordinary Activities Before Tax (5 - 6)** | **279.94** | **(50.87)** | **69.17** | **481.48** | **213.28** |
| (8) | Tax Expenses | | | | | |
| | (a) Current Tax | 16.90 | - | - | 16.90 | - |
| | (b) Deferred Tax | 655.08 | - | (155.83) | 624.86 | (56.34) |
| | (C) Adjustment of tax relating to earlier period | - | - | 10.87 | - | 10.87 |
| | **Total Tax Expenses (8)** | 671.98 | - | (144.96) | 641.76 | (45.47) |
| (9) | **Net Profit/(Loss) for the period (7 - 8)** | **(392.04)** | **(50.87)** | **214.13** | **(160.28)** | **258.75** |
| (10) | Other Comprehensive Income | | | | | |
| (11) | **Total Comprehensive Income for the period (9+10)** | **(392.04)** | **(50.87)** | **214.13** | **(160.28)** | **258.75** |
| (12) | Paid-Up Equity Share Capital shares of Rs.10 /-Each | 1,041.00 | 1,041.00 | 208.20 | 1,041.00 | 208.20 |
| (13) | Other Equity excluding revaluation reserve | 703.21 | 1095.26 | 1696.29 | 703.21 | 1696.29 |
| (14) | **Earnings Per Equity Share (Not Annualised)** | | | | | |
| | (a) Basic | (3.77) | (0.49) | 10.28 | (1.54) | 12.43 |
| | (b) Diluted | (3.77) | (0.49) | 10.28 | (1.54) | 12.43 |
| | (See accompanying notes to the financial results) | | | | | |

**NOTES:**
1. The company has adopted Accounting Standards (Ind AS) notified by the Ministry of Corporate Affairs with effect from 1st April, 2017 with a transition date of 1st April, 2016 and accordingly these financial results have been prepared in accordance with Indian Accounting Standards (Ind AS) as prescribed under section 133 of the Companies Act, 2013read with Rule 3 of the Companies (Indian Accounting Standards) Rules, 2015 and relevant amendment rules thereafter.
2. The above is an extract of the detailed format of Financial Results filed with the Stock Exchanges under Regulation 33 of the SEBI (Listing Obligation and Disclosure Requirements) Regulation, 2015. The full format of the financial result is available on the Stock Exchange websites: : www.nseindia.com & company's website: www.crownlifters.com.
3. The above results are audited by statutory auditor of the company and have been reviewed by the Audit Committee and approved by the Board of Director at their meeting held on 26th May, 2022.
4. The figures of the last three month represent the balancing figures between audited figures in respect of financial year and the published year-to-date figures up to nine month of current financial year.
5. Previous period figures have been regrouped/reclassified /rearranged, wherever necessary to make them comparable to figures of the current periods.
6. The Company has allotted 83,28,000 equity shares of Rs. 10/- each as fully paid up bonus shares on 02nd November 2021. Consequently, the issued, subscribed and paid-up equity share capital of the company stands increased from Rs. 2,08,20,000 divided into 20,82,000 equity shares of Rs. 10/- each to Rs. 10, 41,00,000/- divided into 1, 04,10,000 equity shares of Rs. 10/- each.
7. The Company has received migration approval from NSE i.e. the company has been migrated from NSE Emerge Platform to Main Board Platform of the Exchange (NSE) w.e.f. 8th February, 2022. Accordingly the securities of the company were listed and traded on Main Board of NSE from 8th February, 2022.

**On behalf of the Board of Directors**
**CROWN LIFTERS LIMITED**
**Mr. Karim Kamruddin Jaria**
**Chairman & Managing Director**
**DIN: 00200320**

**Place : Mumbai**
**Date : 27-05-2022**

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# खरे तर फाशीच हवी होती

वर्षानुवर्षे दहशतीचा धुमाकूळ घातला गेला. त्या दहशतीला पाकिस्तानकडून सर्व प्रकारची मदत केली गेली. जणू काही काश्मिरमध्ये पाकिस्तानचे अधिकृत प्रतिनिधी म्हणून यासिम मलिक याने प्रचंड धुडगूस घातला. कशाही परिस्थितीत काश्मिरात शांतता प्रस्थापित होऊ द्यायची नाही. तिथल्या तरुणांची माथी भडकावून भारतविरोधी वातावरण कायम पेटवत ठेवायचे. लष्करी जवानांवरचे हल्ले असू देत, सीमा सुरक्षा दलाच्या शिपायांना टार्गेट करण्याचा प्रकार असू दे किंवा अगदी निष्पाप, निरपराध दहशतीला विरोध करणाऱ्या सामान्य माणसांचे हत्याकांड असू दे. अशा प्रत्येक देशविरोधी कारवायांमध्ये आघाडीवर असलेल्या यासीन मलिकला न्यायालयाने दोन जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. परंतु जिथे फाशीची शिक्षा दिली जायला हवी होती तिथे दोन जन्मठेपेंवर त्याची शिक्षा निभावली आहे. ही शिक्षा सुनावल्यानंतर पाकिस्तानमध्ये व्यक्त झालेल्या प्रतिक्रिया यासिन मलिक नेमका कोण आहे. याच्यावर प्रकाशझोत टाकणाऱ्या आहेत. त्यांनी यासिन मलिकला दिलेली ही शिक्षा अयोग्य असल्याचे म्हटले आहे. याचा अर्थ पाकिस्तान आणि यासिन मलिक यांचे संबंध किती घनिष्ट स्वरूपाचे आहेत, हेदेखील स्पष्ट होते. अशा शत्रू राष्ट्राच्या हस्तकाला फाशी हीच शिक्षा योग्य ठरते. कारण काश्मिरमध्ये पोसल्या गेलेल्या या विषवल्लीला याच पध्दतीने खेचून काढले गेले पाहिजे. फाशीची शिक्षा दिली गेली असती तर अजूनही काश्मिरमध्ये वळवळत असलेल्या फुटीरतावाद्यांना मोठी चपराक बसली असती. पाकिस्तानच्या जोरावर आणि शस्त्रास्त्रांच्या मदतीने दहशत माजवणाऱ्या या शत्रूवर दहशत बसवायची असेल तर मृत्युदंड हीच शिक्षा योग्य ठरते. गेली अनेक वर्षे अतिशय मोकाट पध्दतीने आपले वर्चस्व निर्माण करण्याचे काम यासिन मलिक आणि त्याच्या समर्थकांनी केले होते. अतिशय क्रूरतेने सरकारी मालमत्तेची नासधूस करणे, थेट पोलिसावर चाल करून जाणे यासारख्या कारवाया चालू होत्या. यासिन मलिकला पकडण्याचे धाडस दाखवू शकले नाही. त्यामुळेच काश्मिरमधला दहशतवाद तितक्याच उघडपणे जोपासला गेला.

**पाकिस्तान पुरस्कृत दहशत**

दहा वर्षांपूर्वीच शिक्षा झाली असती, तर कितीतरी लोकांचे प्राण वाचले असते. यासिन मलिकसारख्या फुटीरतावाद्यांना राज्य सरकारकडून संरक्षण दिले जात होते. सरकारी खर्चाने विशेष सुरक्षा व्यवस्थाही पुरवली जात होती. अनेक प्रकारच्या सरकारी सवलती या फुटीरतावाद्यांना मिळत होत्या. एवढेच नव्हे तर पाकिस्तानकडून अगदी अधिकृतपणे यासिन मलिक आणि त्याच्यासारख्या शेकडो लोकांना पैसा पुरवला जात होता. तिथल्या तरुण मुलांना हाताशी धरून याच पैशाच्या जोरावर त्यांना दगडफेक करायला भाग पाडले जात होते. ज्या दहशतीमुळे बेरोजगार आणि बेकार असलेले हे तरुण पैसे देऊन दगडफेकीसाठी वापरले जात होते. ज्यामध्ये या यासिन मलिकचा सर्वात मोठा हात होता. ३७० कलम हटवण्यापूर्वी तिथल्या अनेक फुटीरतावाद्यांची धरपकड केली गेली. कारण त्यांच्या कारवाया इतक्या विघातक स्वरूपाला पोहोचल्या होत्या की, त्यांना मोकाट ठेवणे म्हणजे दहशतवादाला खतपाणी घालण्यासारखेच ठरणार होते. राष्ट्रीय तपास यंत्रणेसारख्या संस्थेने अतिशय वेगाने कारवाई केली आणि इतके दिवस मोकळे रान मिळाल्याने वाटेल ते करण्याची सवय लागलेल्या या फुटीरतावाद्यांच्या मुसक्या आवळल्या गेल्या. आतादेखील यासिन मलिकला अटक झाल्याबरोबर त्याच्या पैशावर मौजमस्ती करणाऱ्या तरुणांनी श्रीनगरमध्ये दगडफेक करण्याचा प्रकार केला. म्हणजेच मलिकला जरी जन्मठेप झाली असली तरी त्याने पाळलेले बंदे अजूनही तिथे जीवंत आहेत. म्हणूनच यासिन मलिकला यापेक्षाही अधिक कडक शिक्षा होणे आवश्यक ठरते. त्यानिमित्ताने दगडफेक करणाऱ्या या पिलावळीला मोठा संदेश दिला गेला असता. आपण जर असेच वागलो तर आपलीही खैर नाही. एवढा धाक तरी निर्माण होऊ शकला असता. फाशीची शिक्षा जन्मठेपेवर निभावली आहे. येणाऱ्या काळात यासिन मलिकसारख्या फुटीरतावाद्यांनी पोसलेले हे तरुण केव्हाही त्रास देऊ शकतात. म्हणूनच जे जे फुटीरतावादी किंवा दहशतवादाचे पोषिंदे सापडतील त्या सर्वांचे शक्य तितक्या लवकर दफन करणे हाच प्रभावी उपाय ठरतो.

# मुंबई-गोवा मार्गावरील परशुराम घाट सुरू

■ रत्नागिरी

**मुंबई-गोवा** महामार्गावरील चौपदरीकरणाच्या कामासाठी महिनाभरापासून रोज दुपारी ५ तास बंद असणारा परशुराम घाट आजपासून नियमित वाहतुकीसाठी सुरू झाला. त्यामुळे प्रवासी आणि वाहनचालकांना मोठा दिलासा मिळाला आहे. घाटाच्या रुंदीकरणाचे ६५ टक्के काम पूर्ण झाले आहे.

कंत्राटदाराने घाट बंद ठेवण्यासाठी आणखी मुदतवाढ मागितली होती. परंतु महामार्ग विभागाने ती नाकारली. त्यामुळे आजपासून घाट पुन्हा खुला झाला आहे. मुंबई-गोवा महामार्गाच्या रुंदीकरण आणि चौपदरीकरणाचे काम सुरू आहे. त्यात परशुराम घाटातील वाहतूक रोज दुपारी १२ ते सायंकाळी ५ या वेळेत चौपदरीकरणासाठी बंद ठेवली जात होती. २० एप्रिलपासून हे काम सुरू होते. त्यामुळे प्रवासी आणि वाहनचालकांची मोठी गैरसोय होत होती. मात्र आता या घाटाच्या रुंदीकरणाचे ६५ टक्के काम पूर्ण झाले आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील परशुराम ते आरवली या ३४ किलोमीटरच्या रस्त्यापैकी २० किलोमीटर रस्त्याचे काम अद्याप शिल्लक आहे. परशुराम घाटाच्या दुरुस्ती, रुंदीकरणासाठी घाट महिनाभरापासून दररोज दुपारी ५ तास बंद ठेवला जात होता.

## सुविचार

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी.
मोबा.९४२२४२०६११

वाईट वाटेल असे सत्य नक्की बोला,
पण खरे वाटेल असे खोटे कधीही बोलू नका.

## पंचांग

**शुक्रवार २७ मे, २०२२**
**शक १९४४ शुभकृत्नामसंवत्सर**

**वैशाख कृष्ण द्वादशी * नक्षत्र : अश्विनी**

**रवी उदय- ०६-०२**
**रवी अस्त- १९-०९**



**-: जन्मराशी :-**
**००-०१ ते ००-३७ मीन**
**००-३८ ते २४-०० मेष**

**प्रदोष**

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफिस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे**

संपर्क - जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
वितरण विभाग : ९५९४९३६४४१ छोट्या जाहिराती: ८४२२८१७४४५.
ई-मेल navakal.1923@gmail.com
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक 'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
REGD. No. MH/MR/SOUTH-143/2012-14
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande**

## पाककृती



# एगलेस मँगो केक...

★**साहित्य :-** दीड कप कणीक, १ चमचा बेकिंग पावडर, अर्धा चमचा बेकिंग सोडा, १०० ग्रॅम बटर, २०० ग्रॅम कंडेंस्ड मिल्क, १ कप मँगो प्युरी, ३-४ टेबलस्पून साखर, १ टीस्पून व्हेनिला इसेंस.

★**कृती :-** सर्वप्रथम ओव्हनला १८० डिग्री सें. वर १५ मिनिटांपर्यंत प्रीहीट करा. कणकेला बारीक चाळणीने चाळून घ्या. यात बेकिंग पावडर आणि बेकिंग सोडा मिसळून वेगळे ठेवा. एका बाऊलमध्ये बटर, मँगो प्युरी, कंडेंस्ड मिल्क, साखर आणि व्हेनिला इसेंस फ्लफी होईपर्यंत फेटून घ्या. आता यात कणीक मिसळून एकाच दिशेने परत फेटा. या मिश्रणाला केक टिनमध्ये घाला. प्रीहीट ओव्हनमध्ये केक टीन ठेवून ४० मिनिटांपर्यंत बेक करा.



# चांगली कामगिरी करूनही लखनौ संघ बाहेर
# पाटीदारच्या नाबाद शतकामुळे आरसीबीचा विजय

**यंदाच्या आयपीएलमध्ये लखनौ सुपर जायंट संघाने चांगली कामगिरी केली होती. पण अंतिम टप्प्यात मात्र त्यांना अपयश आले आणि आरसीबी विरुद्धच्या क्वालिफायर सामन्यात लखनौचा अवघ्या १४ धावांनी पराभव झाला . परिणामी त्यांना अंतिम फेरी गाठता आली नाही. प्ले-ऑफमध्येच त्यांचे आव्हान संपुष्टात आले.**

■ मुंबई



**बंगळुरू** विरुद्धच्या सामन्यात लाखनौने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला आणि पहिल्याच षटकांत मोहसीन खानने आरसीबीचा कर्णधार दुप्लीसी याला शून्यावर बाद करून आरसीबीला मोठा धक्का दिला पण नंतर पाटीदार, कोहली दिनेश कार्तिक यांनी आरसीबीला सावरले. तर पाटीदार आणि दिनेश कार्तिक यांच्या फटकेबाजीने २०० धावांचा टप्पा गाठून दिला. पाटीदारने नाबाद शतक झळकावले.

त्यानंतर २०८ धावांचे टार्गेट घेऊन मैदानात उतरलेल्या लखनौ सुपर जायंटची सुरुवात खराब झाली. सलामीवीर डीकॉक अवघ्या ६ धावांवर बाद झाला. तर मधल्या फळीतील वोहराला हेजलवूडने १९ धावांवर बाद केले. पण त्यानंतर कर्णधार के. एल. राहुल आणि दीपक हुड्डा यांनी किल्ला लढवला आणि ९६ धावांची मजबूत भागीदारी केली. मात्र विजय जवळ आलेला असतानाच हुड्डा ४५ धावांवर बाद झाला. त्यानंतर धावसंख्या वाढवण्याच्या नादात कर्णधार राहुलही ७९ धावांवर बाद झाला. हुड्डा याला हसरंगाने तर राहुलला हेजल्वूडणे बाद केले. मात्र ज्या स्टोईनीशकडून लखनौला मोठी आशा होती तो ९ धावांवर बाद झाल्याने लखनौच्या विजयाच्या आशा संपुष्टात आल्या. त्यानंतर लेविस २, कुणाल पांड्या ० आणि चामीरा ११ यांनीही निराशा केली आणि लखनौचा डाव २० षटकात १९३ धावांवर आटोपला व आरसिबीने हा सामना १४ धावांनी जिंकला.

आता आरसीबीची उपांत्य फेरीत राजस्थान रॉयलशी गाठ पडणार असून या सामन्यात जो विजयी होईल तो २६ मी रोजी अहमदाबाद येथील अंतिम सामन्यात गुजरात टायटन संघाशी दोन हात करील. मात्र जर लखनौ अंतिम फेरीत पोहोचला असता तर आयपीएल मध्ये प्रथमच दाखल झालेल्या दोन नवख्या संघांमध्ये फायनल झाली असती. पण तसे होऊ शकले नाही. यंदाच्या आयपीएलमध्ये चांगली कामगिरी करूनही त्यांना बाहेर जावे लागले.

## रोहित व विराटची सौरभकडून पाठराखण

■ दिल्ली

**आयपीएलमध्ये** भलेही रोहित शर्मा आणि विराट कोहली यांची कामगिरी चांगली झालेली नसली तरी भविष्यातील स्पर्धांमध्ये ते नक्कीच चांगली कामगिरी करतील, असा विश्वास बीसीसीआयचे अध्यक्ष सौरव गांगुली यांनी व्यक्त केला आहे. रोहित शर्मा आणि विराट कोहली यांची पाठराखण करताना गांगुलीने सांगितले की, विराट आणि रोहित शर्मा हे दोघे मोठे खेळाडू आहेत आणि भारताला त्यांनी अनेक वेळा विजय मिळवून दिलेला आहे. मात्र कधी कधी खेळाडूना बॅडपॅच येतो आणि त्यांच्या धावा होत नाहीत अशावेळी त्यांना संघाबाहेर करता येत नाही. कारण त्यांच्या सहभागामुळे प्रतिस्पर्धी संघावर दबाव असतो असेही गांगुली यांनी सांगितले.

# कोळी चषक स्पर्धेत वांद्रे-विरार अंतिम लढत

■ मुंबई

**माटुंगा** येथील न्युहिंद स्पोर्टिंग क्लबच्या विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या १६ वर्षांखालील मुलांच्या आंतर केंद्र निवड चाचणी कल्पेश गोविंद कोळी स्मृती चषक क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम सामन्यात विरार विरूद्ध वांद्रे केंद्र यांच्यात अंतिम फेरीचा सामना रंगणार आहे. उपांत्य फेरीच्या सामन्यात वांद्रे केंद्राने घाटकोपर केंद्राचा पहिल्या डावातील आघाडीच्या जोरावर पराभव केला.

घाटकोपर केंद्राने पहिल्या डावात १५२ आणि दुसऱ्या डावात ५ बाद ५७ धावांवर डाव सोडला. वांद्रे केंद्राने १५३ धावा केल्या. त्यांच्या राठीने ६६ धावांची शानदार खेळी केली. बंगेराने सुरेख मारा करताना एकूण ९ बळी टिपले. त्यालाच सामनावीर पुरस्काराने गौरविण्यात आले. एलआयसीचा पुरस्कार लाभलेल्या या स्पर्धेत विरार केंद्राने देखील नाहूर केंद्राचा पहिल्या डावातील आघाडीच्या जोरावर पराभव केला. विरारने पहिल्या डावात २३६ धावा केल्या होत्या. नाहूरचा पहिला डाव १२१ धावातच आटोपला. विरारतर्फे शुल्काने ५ तर गोरिवालेने ४ बळी टिपले. म्हात्रेने ४६, मेहेरने नाबाद ५७ धावा केल्या. म्हात्रेने पहिल्या डावात दमदार शतकी खेळी केली. त्याचे हे स्पर्धेतील तिसरे शतक होते. विरारचे नेतृत्त्व करणाऱ्या म्हात्रेने आपल्या फलंदाजीची छाप स्पर्धेवर पाडली आहे. सामनावीर पुरस्कार त्यालाच देण्यात आला.

## केडीए हॉस्पिटलचा दुसरा विजय

■ मुंबई

**अलकेत** तांडेलची ४ षटकार व ५ चौकारांसह ७३ धावांची आक्रमक फलंदाजी आणि हितेश विघावेचे १६ धावांत ६ बळी, यामुळे कोकिलाबेन धीरूभाई अंबानी-केडीए हॉस्पिटल संघाने ब्रीच कॅन्डी हॉस्पिटलला ५१ धावांनी हरवून सलग दुसरा साखळी विजय मिळविला. आयडियल स्पोर्ट्स अकॅडमीतर्फे ओम्नी ग्लोबल स्पोर्ट्स मॅनेजमेंट सहकार्याने मुंबईचे माजी नगरपाल डॉ. जगन्नाथराव हेगडे आणि कार्याध्यक्ष गोविंदराव मोहिते गौरवार्थ सुरु झालेल्या आंतर हॉस्पिटल टी-२० क्रिकेट स्पर्धेमध्ये पराभूत संघाचा कप्तान प्रदीप क्षीरसागरने अष्टपैलू खेळ केला.

## प्रगनानंद चेसेबलच्या अंतिम फेरीत

■ दिल्ली

**भारताचा** १६ वर्षीय ग्रँड मास्टर प्रगनानंद याने चेसेबल मास्टर्स बुद्धिबळ स्पर्धेच्या उपांत्य फेरीत नेदरलँडचा अनिश गिरी याचा पराभव करून प्रथमच या स्पर्धेची अंतिम फेरी गाठली आहे. आता अंतिम फेरीत त्याचा मुकाबला जागतिक क्रमवारीत दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या चीनच्या डिंग लीरेण याच्याशी होणार आहे. उपांत्य फेरीत प्रगनानंदा याच्या समोर जागतिक क्रमवारीत दहाव्या क्रमांकावर असलेल्या गिरीचे कडवे आव्हान होते.

**खबरदारीची सूचना**

सर्वसाधारण जनतेस याद्वारे **खबरदार** करण्यात येते की, गिल्बर्ट कंपाउंड, खेरानी रोड, साकिनाका, मुंबई ४०० ०७२ येथे स्थित सर्व्हे क्र. ३५ चा भाग असलेली गाळा क्र. ८, मोजमाप १७५० चौ.फू. ही मालमत्ता सध्या **श्री. खान बहादूर यांचे पुत्र श्री. रियाझुद्दीन खान** यांच्या मालकीची आहे.
ते **श्री. खान बहादूर राहत हुसैन** हे वरील सदर मालमत्तेचे मालक असल्याचा खोटा दावा करीत आहेत.
म्हणून, सर्वसाधारण जनतेस वरील सदर गाळ्याच्या बाबतीत कोणत्याही प्रकारे सदर व्यक्तीसोबत व्यवहार न करण्याबाबत **खबरदार** करण्यात येते आणि असे असूनही कोणी व्यक्ती वरील सदर मालमत्तेच्या बाबतीत त्याच्यासोबत कोणताही करारनामा किंवा व्यवहार करीत असल्यास, तो/ते त्याच्या/त्यांच्या स्वतःच्या खर्च आणि जोखमीवर तसे करतील याची कृपया नोंद घ्यावी.
सी. एस. जाधव ॲण्ड असोसिएट्स
ॲड. सी. एस. जाधव
वकील उच्च न्यायालय,
११/बी/००४, साफल्य सीएचएसएल, चांदिवली म्हाडा कॉलनी, चांदिवली, मुंबई - ४०० ०७२.
दूर.- +९१ ९९६७२ ७७५७७;
jchandrra@gmail.com

**जाहीर सूचना**

याद्वारे सूचना देण्यात येते की, आम्ही आमच्या अशिलाच्या सूचनांनुसार (१) जयपाल भालचंद्र सुंकेरसेट्ट, (२) शुभा जयपाल सुंकेरसेट्ट, (३) अंजली भुपाल सुंकेरसेट्ट, (४) संध्या अतूल प्रभू आणि (५) पूजा मनिष रेळे, (६) अभिषेक भूपाल सुंकेरसेट्ट, यांच्या या खालील अनुसूचीमध्ये वर्णन केलेल्या मालमत्तेच्या संदर्भातील शीर्षकाची तपासणी करीत आहोत.
याखाली लिहिलेल्या अनुसूचीमध्ये वर्णन केलेल्या मालमत्ता किंवा तिच्या कोणत्याही भागाच्या संदर्भात किंवा विरुद्ध विक्री, हस्तांतरण, नियुक्ती, अदलाबदल, बोजा, गहाणवट, वारसा, हिस्सा, भेट, मृत्यूपत्र, धारणाधिकार, प्रभार, देखभाल, वहिवाट, न्यास, भाडेपट्टी, उप-भाडेपट्टी, भाडेकरू, उप भाडेकरू, लिव्ह ॲण्ड लायसन्स, करारपत्र, करारनामा, ताबा, किंवा कोणत्याही प्रकारच्या अन्य मार्गे कोणताही हक्क, शीर्षक, दावा, मागणी, धारणाधिकार इ. असणाऱ्या आणि/किंवा विवाद, दावा, हुकूम, प्रतिबंधात्मक आदेश, करार, मनाई हुकूम, जप्ती, संपादन किंवा मागणी किंवा इतर कोणताही दावा असणाऱ्या कोणत्याही व्यक्ती(र्ती)नी त्याबाबत निम्नस्वाक्षरीकारांना त्याच्या समर्थनार्थ असलेल्या कागदोपत्री पुराव्यांसह लेखी स्वरुपात, सदर प्रसिद्धीच्या दिनांकापासून १४ (चौदा) दिवसांच्या कालावधीमध्ये सूचित करणे आवश्यक आहे. असे न केल्यास, अशा व्यक्ती/व्यक्तींचे असा दावा किंवा दावे जर असल्यास, सोडून दिले आणि/किंवा गुंडाळून ठेवले आणि/किंवा त्याग केले किंवा अस्तित्वातच नाहीत असे समजण्यात येईल.

वरील उल्लेखित अनुसूची
(सदर जमिनीचे वर्णन)

गाव मालडुंगे, तालुका पनवेल, जिल्हा रायगड येथील सर्व कृषिक जमीनः

| गट क्र. | क्षेत्रफळ एच.-ए. | मूल्यांकन रु.-पै. | चतु:सीमा |
|---|---|---|---|
| १४३/१ (जुना गट क्र. २८/१ | ०.९३.५० पीके.०.१५.८० ----------- १.०९.३० | १०.२८ | पूर्वेस : गट क्र. १४४ धारण केलेल्या जमिनीद्वारे<br>पश्चिमेसः गट क्र. १४९ (जुना गट क्र. ३४) धारण केलेल्या जमिनीद्वारे<br>दक्षिणेस : गट क्र. १४३/३ धारण केलेल्या जमिनीद्वारे<br>उत्तरेस : गट क्र. १४८ धारण केलेल्या जमिनीद्वारे |
| १४४ (जुना गट क्र. २९ | ९.७९.४० पीके.०.४५.०० ----------- १०.२४.४० | २३.९१ | पूर्वेस : गट क्र. १२२/८, गट क्र. ५० धारण केलेल्या जमीन आणि नदीद्वारे<br>पश्चिमेस : गट क्र. १४३/१ आणि १४८ धारण केलेल्या जमिनीद्वारे<br>दक्षिणेस : नदीद्वारे<br>उत्तरेस : गट क्र. १४७/४ धारण केलेल्या जमिनीद्वारे |
| १४९ (भाग) (जुना गट क्र. ३४/२/ए | २४.१३.५१ पीके.३.६४.०० ----------- २७.९७.५१ | ४३.४३ | पूर्वेस : गट क्र. १४७, १४८, १४३/१ धारण केलेल्या जमिनीद्वारे<br>पश्चिमेस : गट क्र. १४०, १५१, १५२, १४१, १४९ (भाग), २१/३, २० धारण केलेल्या जमीन आणि गाव धामणीच्या सीमेद्वारे<br>दक्षिणेस : गट क्र. १४२, १४३ धारण केलेल्या जमीन, नदी आणि गाव देहरंगच्या सीमेद्वारे<br>उत्तरेस : गट क्र. १५३, १५४ धारण केलेल्या जमिनीद्वारे |

दिनांक २७ मे, २०२२
**पांड्या ॲण्ड पूनावाला** करिता
सही/-
(यतिश बी. पांड्या
भागिदार
वकील आणि सॉलिसिटर्स
१०२-१०४, भाग्योदय, १ ला मजला, ७९, नगिनदास मास्टर रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ०२३.

**फॉर्म ए**
**जाहीर उद्घोषणा**
(भारतीय नादारी आणि दिवाळखोरीपणा मंडळ (कॉर्पोरेट व्यक्तींकरिता दिवाळखोरी ठराव प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या विनियमन ६ अन्वये)
**केसर टर्मिनल्स अँड इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडच्या धनकोंचे लक्ष वेधण्याकरिता**

संबंधित तपशील

| | | |
|---|---|---|
| १. | कॉर्पोरेट कर्जदाराचे नाव | केसर टर्मिनल्स ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड |
| २. | कॉर्पोरेट कर्जदाराच्या स्थापनेचा दिनांक | दि. २१.०१.२००८ |
| ३. | प्राधिकरण ज्या अंतर्गत कॉर्पोरेट कर्जदाराची स्थापना/नोंदणीकरण झाले | आरओसी - मुंबई |
| ४. | कॉर्पोरेट कर्जदाराचा कॉर्पोरेट ओळख क्रमांक / मर्यादित दायित्व ओळख क्रमांक | L45203MH2008PLC178061 |
| ५. | कॉर्पोरेट कर्जदाराच्या नोंदणीकृत कार्यालयाचा आणि प्रमुख कार्यालयाचा (जर असल्यास) पत्ता | ओरिएंटल हाऊस, ७, जमशेदजी टाटा रोड, चर्चगेट, मुंबई - ४०० ०२० |
| ६. | कॉर्पोरेट कर्जदाराच्या संदर्भात दिवाळखोरी सुरु होण्याचा दिनांक | दि. ०७.०३.२०२२ (दि. ०७.०३.२०२२ रोजीच्या आदेशाची प्रत अंतरिम ठराव व्यावसायिकांना दि. २६.०५.२०२२ रोजी प्राप्त झाली) |
| ७. | दिवाळखोरी ठराव प्रक्रिया परिसमाप्तीचा अंदाजित दिनांक | दि. २२.११.२०२२ पासून (दि. २६.०५.२०२२ म्हणजेच अंतरिम ठराव व्यावसायिकांना आदेश प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून) १८० दिवस. |
| ८. | अंतरिम ठराव व्यावसायिक म्हणून काम पाहणाऱ्या दिवाळखोरी व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणीकरण क्रमांक | श्री. प्रशांत जैन (IBBI/IPA-001/IP-P01368/2018-2019/12131) |
| ९. | मंडळाकडे नोंदणीकृत असल्यानुसार, अंतरिम ठराव व्यावसायिकाचा पत्ता आणि ईमेल | ए५०१, शांती हाईट्स, प्लॉट क्र. २, ३, ९बी/१०, सेक्टर ११, कोपरखैराणे ठाणे, नवी मुंबई - ४००७०९. ईमेल : ipprashantjain@gmail.com |
| १०. | अंतरिम ठराव व्यावसायिकासह पत्रव्यवहाराकरिता वापरावयाचा पत्ता आणि ईमेल | बी/६१०, बीएसईएल टेकपार्क, वाशी रेल्वे स्थानकासमोर, वाशी, नवी मुंबई - ४०० ७०३.. ईमेल : kesar.cirp@gmail.com |
| ११. | दावे सादर करण्याचा अंतिम दिनांक | ०९.०६.२०२२ |
| १२. | अंतरिम ठराव व्यावसायिकाद्वारे निश्चित केल्यानुसार, कलम २१ च्या उप-कलम (६अ) च्या खंड (ब) अन्वये कर्जदारांचे वर्ग, जर असल्यास. | लागू नाही |
| १३. | वर्गामध्ये कर्जदाराचा प्राधिकृत प्रतिनिधी म्हणून काम करण्याकरिता ठरविण्यात आलेल्या दिवाळखोरी व्यावसायिकांची नावे (प्रत्येक वर्गामध्ये तीन नावे) | लागू नाही |
| १४. | (अ) संबंधित अर्ज आणि (ब) अधिकृत प्रतिनिधींचा तपशील उपलब्ध असेल : | https://www.ibbi.gov.in/home/downloads |

याद्वारे सूचना देण्यात येते की, मान. राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ यांनी **दि. ०७.०३.२०२२** रोजी **केसर टर्मिनल्स ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड**ची कॉर्पोरेट दिवाळखोरी ठराव प्रक्रिया सुरू करण्याचे आदेश दिले आहेत. (दि. ०७.०३.२०२२ रोजीच्या आदेशाची प्रत अंतरिम ठराव व्यावसायिकांना दि. २६.०५.२०२२ रोजी प्राप्त झाली)
**केसर टर्मिनल्स ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड**च्या धनकोंना याद्वारे त्यांचे दावे पुराव्यासह **दि. ०९.०६.२०२२** रोजी किंवा त्यापूर्वी अंतरिम ठराव व्यावसायिक यांच्याकडे नोंद क्र. १० समोर नमूद पत्त्यावर सादर करण्यास सांगण्यात येत आहे.
वित्तीय धनको यांनी दाव्याबाबतचे त्यांचे पुराव्यासहीत दावे फक्त इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करावे. इतर सर्व धनको त्यांचे दाव्याबाबतचे पुरावे व्यक्तिशः, टपालाद्वारे किंवा इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करू शकतात.
**दाव्याबाबतचे चुकीचे किंवा दिशाभूल करणारे दावे सादर केल्यास दंड ठोठावण्यात येईल.**
**श्री. प्रशांत जैन**
अंतरिम दिवाळखोरी व्यावसायिक
दिनांकः २७.०५.२०२२
ठिकाणः मुंबई
नोंदणीकरण क्र.: IBBI/IPA-001/IP-P01368/2018-2019/12131

**जाहीर सूचना**

या सूचनेद्वारे सुचित करण्यात येते की, इसम नाव **श्री.राजु गंगाधर बत्तीनी** वय वर्षे ४०, राहणार पत्ताः रू.नं. ०३, बॉक्स नं.०१, नेहरूनगर झोपडपट्टी, विलेपार्ले (प.), मुंबई यांचे सदर घराचे मूळ कागदपत्र हरविले आहेत. कागदपत्र हरविल्याची नोंद जुहू पोलीस ठाणे येथे केली असून जी.डी.नं. (ठाणे दैनंदिनी क्र.) ०१४ आहे. तरी वरील कागदपत्र कोणास मिळाल्यास या मोबाईल नं.- **९८६७९६४००९** संपर्क साधावा किंवा वरील पत्त्यावर संपर्क करावा.

**जाहीर नोटीस**

मिठालाल बस्तीमल जैन, हे मुळ भाडेकरु, रा.ठि. शांतीकुंज इस्टेट, ८७, नायगांव कॉस रोड, दादर पूर्व, मुंबई-४०००१४ यांचा दिनांक २७/०२/२०१७ रोजी मृत्यु झाला आहे.
माझे अशिल मेसर्स बोनी एन्टरप्रायझेस, शांतीकुंज इस्टेट, सिटी सर्व्हे नंबर १०५, ८७, नायगांव कॉस रोड, दादर पूर्व, मुंबई-४०००१४ चे घरमालक/मालक आहेत. मिठालाल बस्तीमल जैन यांच्या मृत्यु पश्चात त्यांचे कायदेशीर वालीवारस नामे राकेश मिठालाल जैन आणि हितेश मिठालाल जैन यांच्या नांवे उपरोक्त रुम ट्रान्सफर करण्यासाठी अर्ज प्राप्त झाला आहे आणि त्यासाठी कायदेशीर वालीवारसांची आई-ललिता मिठालाल जैन आणि बहिण-रेखा रांका यांनी त्यांचे संमतीपत्र सादर केलेले आहे आणि तदसंबंधी असणारे मृत्यु प्रमाणपत्र आणि इन्डीमनिटी बॉन्डच्या स्वरुपात असणारी कागदपत्रे सादर केलेली आहेत.
माझे अशिल मेसर्स बोनी एन्टरप्रायझेस, घरमालक यांच्याकडे आलेल्या अर्जाच्या अनुषंगाने राकेश मिठालाल जैन आणि हितेश मिठालाल जैन यांच्या नांवे उपरोक्त मिळकत ट्रान्सफर करण्याची प्रकिया विचाराधीन आहे.
अशी नोटीस देण्यात येते की, दुकान नंबर ५, शांतीकुंज इस्टेट, सिटी सर्व्हे नंबर १०५, ८७, नायगांव कॉस रोड, दादर पूर्व, मुंबई-४०००१४ हया मालमत्तेसंदर्भात कोणालाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप किंवा हरकत असल्यास त्यांनी तदसंबंधी हरकत वा दावा लेखी सादर करावा आणि ही नोटीस प्रसारीत झाल्यापासुन २१ दिवसाच्या आत योग्यत्या पुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर आपली उचित कागदपत्रे सादर करावीत.
उपरोक्त सुचना प्रसारीत झाल्यापासुन २१ दिवसाच्या आत जर कोणताही दावा वा आक्षेप प्राप्त न झाल्यास किंवा दाखल केलेला दावा वा आक्षेप समाधानकारक नसल्यास, खोटा किंवा बिनबुडाचा ठरल्यास अशा वेळी माझे अशिल हे कायदेशीर वालीवारस म्हणुन राकेश मिठालाल जैन आणि हितेश मिठालाल जैन यांच्या नावे उपरोक्त मालमत्तेचे हक्क व अधिकार हस्तांतरीत करतील.
माझे अशिल असे सुचित करतात की, २१ दिवसाच्या सुचनेनंतर आलेली हरकत, आक्षेप किंवा दावा ग्राहय धरली जाणार नाही, अयोग्य, कार्यवाही न करण्यायोग्य असेल आणि माझे अशिल मेसर्स बोनी एन्टरप्रायझेस यांच्यावर ती बंधनकारक असणार नाही.
आज दिनांक २७ माहे मे सन २०२२ रोजी.
ॲड.ओजस जी. गोळे
१/एफ, कॅलकट हाउस,
टॅमरिन्ड लेन, फोर्ट, मुंबई-४००००१.
९७६९३४३९४६.